ARTHA ( Commercial Weekly )
Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख १६ डिसेंबर, १९५९ | अंक ४६

## विविध माहिती

**गंडक नदी योजना**—गंडक नदी योजना हातीं घेण्याच्या कामीं भारत व नेपाळ ह्यांच्यांत नुकताच करार करण्यांत आला. योजना पूर्ण झाल्यावर नेपाळ व भारत ह्या देशांमधील एकूण ३७ लाख एकर जमिनीला पाणीपुरवठा होईल. गंडक नदीवर दोन विद्युत्केंद्रेंहि उभारण्यांत येणार आहेत; एक नेपाळच्या हद्दींत व दुसरें भारताच्या हद्दींत. प्रत्येक केंद्रांत १०,००० किलोवॅट वीज निर्माण होईल.

**कोचीन येथील बोटींचा कारखाना**—कोचीन येथें भारतामधील बोटी बांधण्याचा दुसरा कारखाना बांधण्यांत यावयाचा आहे. कारखान्यासाठी जी जागा ताब्यांत घेण्यांत येत आहे तीवर सुमारें १,००० कुटुंबें आपला योगक्षेम चालवीत आहेत. त्यांना दुसरीकडे जावें लागेल. ह्या कुटुंबांची सोय करण्यासाठी केरळ सरकारनें २०० एकर जागा मिळविली आहे.

**भारतीय मालाचें दर्शन**—पूर्व आफ्रिकेंतील मोंबासा येथें भारतांत तयार झालेल्या मालाचें प्रदर्शन भरविण्यांत आलें आहे. प्रदर्शनांत छोटीं यंत्रें, विजेचे पंखे, शिवणाचीं यंत्रें, घरगुती सामान, रेशमी व सुती कापड, इत्यादि माल ठेवण्यांत आला आहे. मोंबासा येथील मुदत संपल्यावर हें प्रदर्शन कंपाला, नैरोबी व दार-एस-सलाम येथेंहि नेण्यांत येणार आहे.

**खोडकर मुलाचा चित्रपट**—भारत सरकारच्या माहिती खात्यानें तयार केलेला ‘ हरिआ ’ नांवाचा मुलांसाठी तयार केलेला बोलपट लंडनमध्यें दाखविण्यांत आला. ‘ हरिआ ’ नांवाचा खोडकर मुलगा योग्य मार्गदर्शनानें कसा सुधारतो तें बोलपटांत दाखविण्यांत आलें आहे. ‘ हरिआ ’ हें एका पंजाबी मुलाचें नांव आहे. ब्रिटिश व हिंदी मुलें त्याच्या खोड्या पहातांना मनमुराद हसत होतीं.

**काश्मीरला जाणारे हौशी प्रवासी**—काश्मीरला येणाऱ्या हौशी प्रवाशांच्या संख्येंत वाढ व्हावी म्हणून काश्मीरच्या सरकारनें १ कोटी रुपये खर्च केले आहेत. प्रवाशांना मिळणाऱ्या सुखसोयींत खूप वाढ करण्यांत आली आहे. काश्मीरमध्यें येऊन गेलेल्या पुरानें खूप नुकसानी झाली असतांहि गेल्या जुलै महिन्यांत ७६,००० प्रवासी काश्मीरचा दौरा करून गेले.

**चार्लि चॅपलिनचें सातवें अपत्य**—सुप्रसिद्ध विनोदी नट चॅर्ली चॅपलिन ह्यांना ७ व्या अपत्याचा लाभ झाला आहे. त्यांची पत्नी ३५ वर्षें वयाची असून खुद्द त्यांचें वय ७० वर्षांचें आहे. चॅर्ली चॅपलिन स्वतःच्या भूमिका असलेले चित्रपट स्वतःच काढतात. कांहीं वर्षांपूर्वी ते अमेरिकेंतून निघून स्विट्झरलंड देशांत स्थायिक झालेले आहेत.

**वृद्ध महिलेचें धाडस**—ऑस्ट्रेलिआंतील ८७ वर्षांच्या एका अंध महिलेनें डोळ्याच्या एका रोगावर औषध शोधून काढण्यासाठी संशोधकांना मदत करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें त्या रोगाची लस आपल्या डोळ्यांत टोचून घेतली. रोगावर औषध सांपडण्यास तिच्या ह्या धाडसाचा उपयोग होणार आहे. स्वतःचें नांव गुप्त ठेवण्यास तिनें सांगितलें आहे.

**खोट्या पासपोर्टवाल्याचा शोध**—कोचीन येथून ४५ लोक ब्रिटनला जाणार होते. त्यांनीं पासपोर्ट व इतर कागदपत्राची तयारीहि केली होती. पण भारतामधून ब्रिटनला गेलेल्या ५२ लोकांना नुकतेंच परत आणल्याचें समजल्यावर त्यांनीं आपला बेत रद्द केला आहे. ह्या लोकांचीं नांवें व पत्ते ह्यांचा तलास लावण्यासाठी मध्यवर्ती सरकारचे अधिकारी कोचीनला गेले आहेत.

**नवा सहकारी साखर कारखाना**—संगमनेर तालुक्यांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा एक साखरेचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्याचें भांडवल उभारण्याच्या कामीं आसपासच्या शेतकऱ्यांचा दांडगा उत्साह दिसून आला. १२ लाखांचें भाग-भांडवल अवघ्या ८ दिवसांत खपलें. शेतकऱ्यांनीं शेअर्स विकत घेण्यासाठी आपल्याजवळचें सोनेंहि विकलें.

**पं. नेहरूंच्या भाषणाच्या एक लाख प्रती**—पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनीं चीन-भारत सरहद्दीच्या वादासंबंधीं लोकसभेंत भाषण केलें होतें. चीनचे पंतप्रधान मि. चौन एन. लॉय ह्यांना उत्तर म्हणून केलेल्या ह्या भाषणाच्या एक लाख प्रती काढण्यांत येणार आहेत. काँग्रेसतर्फे इंग्रजी व देशी भाषांतून ह्या प्रतींच्या द्वारें भाषण मुद्राम प्रसृत करण्यांत येणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**सौराष्ट्रांत कोळशाचा शोध** — सौराष्ट्रामधील थानगड भागांत बगडी कोळशाच्या शोधाचें काम सुरू करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. सुरेंद्र-नगर जिल्ह्यांत प्रथम प्रायोगिक काम सुरू करण्यांत येईल आणि नंतर भूस्तरशास्त्रज्ञ सल्ला देतील त्याप्रमाणें इतर कांहीं ठिकाणींहि उत्खनन करण्याचें काम हातीं घेण्यांत येईल.

**जुनागड येथें शेतकी कॉलेज** — मुंबई सरकारनें जुनागड येथें एक शेतकी कॉलेज स्थापन करण्याचें ठरविलें आहे. कॉलेजच्या स्थापनेसाठी ५५ लाख रुपये खर्च येणार आहे. कॉलेजसाठी ८०० एकर जमीन मिळविण्यांत आली आहे. चालू वर्षी सरकारनें कॉलेजसाठी १·८७ लाख रुपयांची तरतूद केली आहे. कॉलेज बहुधा येत्या जूनपासून सुरू होईल.

**सहकारी कारखान्याच्या भागीदारांना इशारा** — मुंबई राज्याचे अर्थमंत्री, श्री. जीवराज मेहता, ह्यांनीं सहकारी कारखान्याचे भाग घेतलेल्या ऊंस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना उसाच्या किंमतीबद्दल अडवणुकीचें धोरण ठेवण्याविरुद्ध इशारा दिला आहे. उसाच्या किंमती दर हंगामाला ठरविण्याचा प्रश्न बिकट होत चालल्याबद्दल त्यांनीं चिंता व्यक्त केली.

**गुरांच्या दवाखान्याची सोय** — मुंबई सरकारनें राज्यांतील सर्व तालुक्यांच्या गांवीं गुरांचे दवाखाने काढण्याची योजना आंखली आहे. संपूर्ण दवाखान्याशिवाय कांहीं ठिकाणीं मदत-केंद्रेंहि स्थापन करण्यांत येणार आहेत. चालू वर्षी ३० तालुक्यांतून दवाखाने व १०० मदतकेंद्रें स्थापन करण्यांत येतील. प्रत्येक दवाखान्यासाठी ५०,००० रुपये व मदतकेंद्रासाठी ७,००० रुपये खर्च येईल.

**वेतनांतील फरक वाढला** — मध्यवर्ती सरकारनें नेमलेल्या पे-कमिशनचा अहवाल आणि त्यावर घेण्यांत आलेले निर्णय ह्यांच्यामुळें मध्यवर्ती सरकारचे नोकर व राज्य सरकारांचे नोकर ह्यांच्या वेतनांतील तफावत आणखीच वाढली आहे, असें मत म्हैसूर सरकारच्या अर्थमंत्र्यांनीं व्यक्त केलें आहे. राज्यसरकारांच्या नोकरावर ह्याचा परिणाम होईल, असेंहि ते म्हणाले.

**केरळ राज्याचा पंचवार्षिक कार्यक्रम** — दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरच्या वर्षांत केरळ सरकार २५ कोटी रुपये खर्च करणार आहे. ह्या रकमेपैकी ४ कोटी रुपयांची रक्कम मध्यवर्ती सरकारच्या अगर मध्यवर्ती सरकारनें मदत करावयाच्या विकास-योजनांवर खर्च करण्यांत येणार आहेत. ह्या योजनांना भारत सरकारकडून मंजुरी मिळाली आहे.


अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें — मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

शेतीच्या मशागतीस लोखंडी बळकट नांगरच वापरा

किर्लोस्कर नांगराने नांगरट खोलवर होत असल्याने जमिनीतील तण न तण निघून पुढील मशागत करणे सुलभ जाते. आपल्या जमिनीच्या मगदुराप्रमाणे योग्य अशा नांगराची निवड करा.




किर्लोस्कर
स्थापना १८८८

सविस्तर माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी (द. सातारा)

TUSA KM 4/59

# अर्थ

बुधवार, ता. १६ डिसेंबर, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## साखरेच्या तुटवड्यावरील उपाय

### दर एकरीं उत्पादन व उतारा ह्यांत वाढ हवी

उसाचें व साखरेचें एकूण उत्पादन वाढत असलें, तरी उसाचें दर एकरीं पडणारें उत्पादन आणि साखरेचा उतारा ह्यांत घट होत चालली आहे ही गोष्ट चिंतनीय आहे. १९४२-४३ मध्यें दर एकरीं उसाचें उत्पादन १४·७३ टन होतें, तें १९५८-५९ मध्यें १४·७० टन झालें आहे; साखरेचा उतारा १०·३१% वरून ९·८४% वर आला आहे. नवी नवी जमीन उसाच्या लागवडीखाली येत आहे, त्यांत उसाचें उत्पादन चांगलें निघूं लागण्यास वेळ लागतो हें खरें असलें, तरीसुद्धां गेल्या पंधरा वर्षांचा आढावा घेतला असतां दर एकरीं उत्पादन वाढलेलें नाहीं, हें कटुसत्य आहे. खालील तक्त्यांत राज्यवार आंकडे दिले आहेत:—

| राज्य | दर एकरीं उत्पादन ( टन ) | | साखरेचा उतारा ( % ) | |
|---|---|---|---|---|
| | १९५८-५९ | १९४२-४३ | १९५८-५९ | १९४२-४३ |
| उत्तर प्रदेश | ११·२ | १३·८ | ९·६० | १०·१६ |
| बिहार | १४·४ | १०·२ | ९·७९ | १०·९२ |
| मुंबई | २५·४ | ३४·१ | ११·४६ | १०·६४ |
| म्हैसूर | २४·७ | १६·४ | १०·३६ | ९·७१ |
| मद्रास | २४·४ | २६·८ | ९·०१ | ९·४५ |
| ओरिसा | १६·० | १९·४ | ९·४५ | ९·९५ |
| पंजाब | १४·१ | ९·६ | ८·५८ | ९·१४ |
| प. बंगाल | १७·८ | १३·६ | १०·२७ | ७·७४ |
| म. प्रदेश | १०·४ | उपलब्ध नाहीं. | ९·६२ | ९·२९ |
| राजस्थान | ९·० | " | ९·१० | ८·८१ |
| केरळ | १०·० | " | ९·३० | ८·७१ |
| आंध्र प्रदेश | ३७·५ | २८·५ | ९·४२ | ९·६८ |
| सबंद भारत | १४·७० | १४·७८ | ९·८४ | १०·३१ |

मुंबई राज्यांतील उसाचा दर्जा सुधारला आहे, हें वरील आंकड्यांवरून दिसून येईल. साखरेचा उतारा १०·६४% चा ११·४६% झाला आहे. मुंबई राज्याची ही सरासरी आहे; कांहीं भागांतील साखरेचा उतारा ह्यापेक्षा अधिकच चांगला वाढला आहे.

"साखर ही शेतांत तयार होते; कारखान्यांत नाहीं" हें साखर कारखानदारांना पूर्णपणें पटलें असल्याकारणानें, कारखानदार स्वतःच्या मालकीच्या उसाकडे भरपूर लक्ष देतात. महाराष्ट्रांतील जमीन व हवामान उसाच्या लागवडीस अधिक अनुकूल आहे, हेंहि खरें आहे. तरी पण जोंपर्यंत उत्तर भारतांत मोठ्या प्रमाणावर लागवड चालू आहे, तोंपर्यंत तीपासूनहि शक्य तेवढी जास्त साखर काढतां येण्याचे प्रयत्न केले पाहिजेत तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचे अखेर ( १९६५-६६ ) साखरेचा आपली गरज ३० लक्ष टन आणि उसाची व खंडसारीची गरज ६० लक्ष टन होईल असा अंदाज आहे. आजचें त्यांचें वार्षिक उत्पादन अनुक्रमें फक्त २० लक्ष टन व ३६ लक्ष टन एवढेंच आहे. तेव्हां, दर एकरीं साखर अधिक काढल्याखेरीज ही गरज भागवितां येणें अशक्य आहे.

---

## भारताला मदत देण्याची शिफारस

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या खास मदतनिधीचे मॅनेजिंग डायरेक्टर मि. पॉल हॉफमन ह्यांनीं न्यूयॉर्क येथें भाषण करतांना अमेरिका मागासलेल्या देशांना देत असलेल्या मदतीविषयीं आपले विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले कीं, अमेरिकेला सर्व राष्ट्रांना मदत करणें शक्य होणार नाहीं. म्हणून अमेरिकेनें १५ किंवा २० देशांनाच मदत देण्याचा प्रयत्न करावा. मात्र हे देश असे असावेत कीं त्यांना मदत केली असता त्यांची आर्थिक भरभराट होण्याचा संभव चांगला बळकट आहे. अशा देशांत भारताचा समावेश एक प्रमुख देश म्हणून करण्यांत यावा. आर्थिक भरभराटीची परीक्षा भारतानें पास होणें अतिशय जरूर आहे. आज परिस्थिति अशी आहे कीं, जगांतील दोन-तृतिआंश म्हणजे जवळजवळ १७० कोटी लोक दारिद्र्य, निरक्षरता आणि अनारोग्य ह्यांच्या चिखलांत रुतलेले आहेत. पण, ह्या लोकांचें जीवनमान सुधारतां येणें शक्य आहे. त्यांच्यांत समृद्ध जीवन जगण्याची आकांक्षा एकदां जागृत झाली म्हणजे नव्या जगाची उभारणी शक्यतेच्या कोटींत येईल. चालू शतकाच्या मध्याच्या सुमारास आर्थिक प्रगतीचा जो वेग आहे तो फारच अल्प आहे; धोका उत्पन्न करण्याइतका अल्प आहे. हा वेग जर वाढवितां आला नाहीं तर सर्व जगभर स्फोटक वातावरण निर्माण होईल. अमेरिकेला जर आपला विकास व्हावा असें वाटत असेल तर तिनें इतरांना मदत केली पाहिजे. पुढच्या १० वर्षांत प्रगतीचा वेग वाढविण्यांत आला पाहिजे. म्हणजे इ. स. २,००० च्या सुमारास दारिद्र्य, निरक्षरता आणि अनारोग्य ह्यांच्याविरुद्ध चाललेली लढाई आपणांस जिंकतां येईल.

---

## उत्कृष्ट मांडलेल्या ताळेबंदाला बक्षीस

दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंडियानें, कंपनीकायद्याप्रमाणें सर्वांत उत्कृष्ट रीतीनें मांडलेल्या हिशेबपत्रकांस ७५० रु. ची ढाल देण्याचें जाहीर केलें आहे. सध्यां, १ एप्रिल, १९५८ ते ३१ मार्च, १९५९ ह्या मुदतीच्या हिशेबांसाठी स्पर्धकांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत. हे अर्ज ३१ डिसेंबर, १९५९ पूर्वी इन्स्टिट्यूटला मिळाले पाहिजेत. अर्जांबरोबर वार्षिक हिशेबांच्या सहा प्रती धाडावयाच्या आहेत. इन्स्टिट्यूटचा पत्ता पो. बॉ. नंबर २६८, मथुरा रोड, न्यू दिल्ली असा आहे.

## रेल्वे एंजिनें निर्यात करण्याची शक्यता

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताचें औद्योगिकरण हातीं घेण्यांत आलें आणि तें त्वरेनें पार पाडण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. विजेचे पंखे, शिवणाचीं यंत्रें, डिझेल एंजिनें, इत्यादि हलक्या वजनाचा एंजिनिअरिंग उद्योगधंद्याचा माल भारतामधून निर्यात होऊं लागला आहे. पण अजून भारी यंत्रसामुग्रीची सुद्धा भारताला जरूरी आहे. तरीसुद्धां रेल्वे एंजिनासारखा अवजड माल निर्यात करण्याच्या अवस्थेपर्यंत भारत पोंचला आहे असें पार्लमेंटमधील चर्चेवरून दिसून येतें. लोकसभेंत एका प्रश्नाला उत्तर देतांना रेल्वे खात्याचे उपमंत्री श्री. शहा नवाझखान म्हणाले कीं सयाम व ब्रह्मदेश ह्या देशांकडून भारतामधील रेल्वे एंजिनाबाबत चौकशी करण्यांत आली आहे. मात्र अजून त्या देशांनीं मागण्या नोंदविलेल्या नाहींत. रेल्वे एंजिनें निर्यात करण्याची शक्यता अजमावण्याच्या दृष्टीनें सरकार शक्य तें प्रयत्न करीत आहे. अलीकडेच रेल्वे खात्याच्या एका प्रतिनिधि मंडळानें आग्नेय आशिआंतील देशांचा ह्या कामासाठी दौरा केला. त्याचप्रमाणें परदेशांतील वकिलातींनाहि ह्या बाबतींत माहिती गोळा करण्याचें सांगण्यांत आलें आहे. सयाम व ब्रह्मदेशाकडून आलेल्या विचारणांचा सरकार विचार करीत आहे. ह्या देशांना रेल्वे एंजिनांचा पुरवठा करण्याच्या कामीं एंजिनांचा दर्जा अगर किंमती ह्यापैकीं कशाचीहि अडचण नाहीं. दर्जापुरतें बोलावयाचें तर भारतीय एंजिनांचा दर्जा इतर कोणत्याहि देशांत तयार झालेल्या इंजिनांइतका चांगला आहे. किंमतीचाहि प्रश्न नाहीं. उलट परदेशांकडून आलेल्या मागण्यांमुळें येथील कामगारांना अधिक रोजगार मिळूं शकेल. रेल्वे एंजिनें व मालाचे डबे तयार करण्याचें सामर्थ्य भारताजवळ भरपूर आहे.

---

## फ्रान्समधील धरणाच्या अपघाताची चौकशी

कांहीं दिवसांपूर्वीं फ्रान्समधील एक मोठें धरण पाण्याचा दाब असह्य होऊन एकाएकीं फुटलें व त्यामुळें आसपासच्या भागांतील लोकांची वित्तहानि व प्राणहानि मोठ्या प्रमाणावर झाली. हें धरण १९५२ सालीं बांधण्यास प्रारंभ झाला तेव्हां सुद्धां ज्या पद्धतीचा अवलंब तें बांधण्यासाठी करण्यांत आला तीवर एंजिनिअर–तज्ज्ञांनीं आक्षेप घेतले होते. आतां तर धरण अकस्मात् फुटण्यामुळें फ्रान्समध्यें टीका–प्रतिटीका ह्यांचें वादळच उठलें आहे. त्यांतहि धरण बांधण्याच्या कामांत फ्रेंच एंजिनिअर्स आणि तज्ज्ञ ह्यांची जगभर ख्याति आहे. तेव्हां धरणाच्या कामांतील तज्ज्ञांनीं बांधलेलें एक अद्यावत् धरण कच्चे ठरल्यामुळें फ्रान्समध्यें वादळ उठावें ह्यांत आश्चर्य नाहीं. गेल्या तीस वर्षांत फ्रान्समध्यें अशा प्रकारचा भयंकर जलप्रलय झाला नाहीं असें म्हणतात. हें धरण पाण्याच्या बाजूनें फक्त २१ फूट रुंदीचें होतें आणि त्याची कमींत कमी रुंदी अवघी ४ फूट होती. जगांतील सर्वांत अरुंद भिंतीचें धरण म्हणून त्याचें वर्णन करण्यांत येत असे. धरणाच्या दोन्ही बाजू डोंगराच्या पक्क्या खडकांत मजबुतीनें रोवण्यांत आलेल्या होत्या. पण, ह्या पद्धतीचें धरण टिकाऊ होणार नाहीं असा कांहीं तज्ज्ञांचा आक्षेप होता. तथापि नेहमींच्या पद्धतीचें धरण बांधण्यासाठी सिमेंट–कॉंक्रीटचे डोंगरच ओतावे लागतात. तसें ह्या पद्धतीच्या धरणाला लागत नाहींत. म्हणजे खर्चाच्या दृष्टीनें ही पद्धत स्वागतार्ह ठरते. अर्थात् योग्य प्रकारची स्थानिक परिस्थिति असेल तरच असें धरण बांधतां येतें. फ्रान्समधील ह्या मोठ्या अपघाताची कसून चौकशी करण्यांत येणार आहे.

## हातमागी मालाची निर्यात

यंदा जुलैमध्यें अमेरिकेस गेलेल्या शिष्टमंडळानें सुमारें १·४५ कोटी रु. किंमतीच्या हातमागी मालासाठी मागण्या मिळविल्या असल्याचें मध्यवर्ती व्यापार व उद्योग खात्याचे उपमंत्री श्री. सतीशचंद्र यांनीं लोकसभेंत सांगितलें.

---

## साखर कारखान्यांस लागणारी यंत्रसामुग्री

देशांत साखर कारखान्यांस लागणारी यंत्रसामुग्री बनविण्यांत बरीच प्रगति झालेली आहे. किंमतींत त्याची कल्पना यावयाची झाल्यास १९५६ मधील ३२ लक्ष रुपये किंमतीचें उत्पादन वाढून १९५९ मध्यें तें ३ कोटी रुपयांवर गेलें. १९५८–५९ मध्यें साखर कारखान्यांच्या यंत्रसामुग्रीची जुळणी करण्यासाठी लागणारे सुटे भाग आयात करण्यास ६४·३ लक्ष रुपयांचें परकीय चलन खुलें करण्यांत आलें.

देशांतील या यंत्रसामग्रीचे सध्यांचे कारखानदार १९६१–६२ पर्यंत संपूर्ण उत्पादनास प्रारंभ करूं शकतील व त्यामुळें त्यानंतर त्यांना प्रतिवर्षीं संपूर्ण साखरनिर्मितीच्या यंत्रसामुग्रीचे १४ संच (प्लँट) पुरवितां येतील असा अंदाज आहे.

---

## हातपंप तयार करण्याचा धंदा

मोटार टायरमध्यें हवा भरण्यासाठी लागणारे हातपंप तयार करण्याच्या धंद्यास ३१ डिसेंबर १९६० नंतर संरक्षण चालू ठेवण्याच्या प्रश्नाची चौकशी करण्याचें काम टॅरिफ कमिशननें हातीं घेतलें आहे. त्यासंबंधांत कमिशननें उत्पादक, आयातदार व ग्राहक यांच्यासाठी खास प्रश्नावली तयार केलेल्या आहेत.

---

## स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनकडून कागदाची आयात

देशांतील कागदाच्या पुरवठ्याची परिस्थिति सुधारावी म्हणून स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें, मोठ्या प्रमाणावर लिहिण्याचा व छपाईचा कागद आयात करण्यासाठी वाटाघाटी कराव्यात असें भारत सरकारनें ठरविलें आहे. कॉर्पोरेशन तावडतोबीनें भारताची ज्या देशांबरोबर रुपयांत पैसे देण्याची व्यवस्था आहे त्या देशांकडून लिहिण्याचा व छपाईचा २५ हजार टन कागद आयात करण्याची व्यवस्था करीत आहे. जशी आणि जेव्हां जरूर लागेल त्याप्रमाणें कॉर्पोरेशन आणखीहि कागद आयात करण्याची व्यवस्था करील.


# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८ ] गिरगांव, मुंबई ४. [ टेलिफोन : २७०९४

| | लाख | | लाख |
|---|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. ८·३० | ठेवी | रु. १०९·९३ |
| रिझर्व्ह | „ ९·०१ | खेळतें भांडवल | „ १३१·७० |
| कर्जें येणें | „ ६७·५१ | तरतें भांडवल | „ १६०·३८ |

तरत्या भांडवलाचें ठेवींशीं प्रमाण : ७६%

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, माहीम, वडाळा, पुणें व बेळगांव.



महिला शाखा : सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई – ४.

## अमेरिकेची भारताला एक हजार कोटी रुपयांहून अधिक मदत

भारत स्वतंत्र झाल्यापासून या देशानें लोकशाही मार्गांनीं जनतेचें राहणीमान सुधारण्याचा जो प्रयत्न चालविला आहे, तो अनेक राष्ट्रांच्या कौतुकास पात्र झाला असून, त्या कामीं त्यांचें सहकार्य मिळत आहे. भारताच्या आर्थिक विकासाच्या या महान् कार्याला सर्वांत मोठी मदत अमेरिकेची झाली असून, या राष्ट्रानें भारताला दिलेली व आश्वासित अशी मदत एक हजार कोटि रुपयांवर गेली आहे.

अमेरिकेचे भारतांतले वकील श्री. एल्स्वर्थ बंकर यांनीं भारताला देण्यांत येत असलेल्या अमेरिकेच्या मदतीचीं उद्दिष्टें खालील शब्दांत निवेदन केलीं आहेत:—

### मदतीचीं उद्दिष्टें

"भारतांतील लोक आणि भारतीय पुढारी हे जगाला असें दाखवून देत आहेत कीं, जें सरकार नागरिकांची प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्य यांविषयीं आदर दाखवितें, अशा सरकारच्या अंमलाखाली लोकशाही वातावरणांत दारिद्र्य, रोगराई आणि निरक्षरता यांवर मात करणें शक्य आहे. गेलीं कांहीं वर्षें भारताच्या आर्थिक विकासाच्या या महान् कार्यांत सहभागी होण्याचा मान आम्हां अमेरिकनांना मिळाला आहे.

"आपलीं दोन्ही राष्ट्रें—जगांतील सर्वांत दोन मोठीं लोकशाही राष्ट्रें—सर्व जनतेचें कल्याण साधणें आणि स्वातंत्र्याच्या वातावरणांत जागतिक शांतता राखणें या समान उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी किती प्रमाणांत सहकार्य करूं शकतील, यावर लोकशाही संस्थांचें भवितव्य अवलंबून आहे, अशी माझी श्रद्धा आहे.

"भारतांत दोन वर्षें काढल्यावर, मला असें वाटतें कीं, आपल्या या दोन राष्ट्रांतील एकमेकांविषयींचा सलोखा क्रमशः आणि खात्रीपूर्वक वाढत आहे आणि भारताचे राज्यप्रतिनिधि श्री. छगला यांनीं अलीकडेच न्यूयॉर्क येथें उद्गार काढल्याप्रमाणें 'तुमचा देश आणि माझा देश यांच्यामधले संबंध इतके जिव्हाळ्याचे पूर्वीं कधींच नव्हते.'"

### तीन प्रकारची मदत

अमेरिकेनें भारताला दिलेली मदत तीन प्रकारची आहे: अन्नटंचाई दूर करण्यासाठी शेतीमाल, तांत्रिक सहकार्य, आणि भांडवली माल मिळविण्याकरितां कर्जें.

प्रथम तिसरी बाब घेऊं. अमेरिका आणि त्याचप्रमाणें इतर राष्ट्रें यांच्यांत भांडवली माल खरेदी करण्यासाठी निर्यात आयात बँक व "विकास कर्जनिधि" या दोन सरकारी संस्थांनीं अनुक्रमें ७४ कोटि रुपये व ९२ कोटि रुपये अशीं कर्जें दिलीं आहेत.

निर्यात आयात बँकेनें दिलेलें कर्ज पाटबंधारे आणि जमीन लागवडीखालीं आणणें, विद्युत्शक्तीचा विकास, कोळसा आणि लोखंड खाणी, रस्ते-वाहतूक आणि औद्योगिक विकास याकरितां लागणारा भांडवली माल अमेरिकेंतून खरेदी करण्याकरितां आहे. विकास कर्ज, निधींतून मिळणारीं कर्जें हीं सरकारी व त्याचप्रमाणें खाजगी विभागांतील—आगगाड्या, वाहतूक, खाणी, रसायनें, सिमेंट, ताग आणि मेकॅनिकल इंजिनियरिंग धंदे अशा विविध योजनांकरितां भांडवली साहित्य खरेदीकरितां आहेत. बँकेचीं कर्जें डॉलरमध्यें पंधरा वर्षांत परत करावयाचीं आहेत, पण विकास कर्ज निधीचीं कर्जें रुपयांमध्यें परत करतां येतील.

भारत सरकारनें इच्छा प्रदर्शित केल्याप्रमाणें अमेरिकन मदतीचा मोठा भाग हा दीर्घकालीन कर्जाच्या स्वरूपाचा असून, त्यांतील बराच भाग (सुमारें अर्धी रक्कम) ही वारंवार उद्भवणारी अन्नटंचाई निवारण्याकरितां, अंतर्गत किंमती खालीं ठेविण्याकरितां व भारताला लागणाऱ्या शेतीमालाकरितां आहे.

अमेरिकेकडून अन्नधान्यें खरेदी करण्याकरितां पहिलें कर्ज सन १९५१ मध्यें देण्यांत आलें. त्या वेळीं भारतांत दुष्काळ पडण्याचा धोका निर्माण झाला होता. हें ९० कोटी रुपयांचें दीर्घकालीन, कमी व्याजाचें कर्ज असून तें पस्तीस वर्षांत २॥ टक्के व्याजानें परत करावयाचें आहे. त्या वेळीं जहाजांची तीव्र कमतरता भासत होती. म्हणून हा २० लाख टन गहूं भारतांत त्वरित नेण्याकरितां अमेरिकन सरकारनें दुसऱ्या महायुद्धाच्या काळांतील आपल्या नाविक दलांतील शंभर बोटी उपयोगांत आणल्या होत्या.

अमेरिकन कॉंग्रेसनें संमत केलेल्या सन १९५१ च्या "इंडिया एमर्जन्सी फूड एड" कायद्यांतील एका कलमान्वयें भारताकडून गव्हासाठी दिलेल्या कर्जावरील व्याजाचा पहिला हप्ता म्हणून जे २ कोटी ३८ लक्ष रु. आले, ते भारतांतील आणि कांहीं प्रमाणांत भारतीयांच्या अमेरिकेंतील उच्च शिक्षणाच्या मदतीकरितां राखून ठेवण्यांत आले. या योजनेखालीं ४८ भारतीय विद्यापीठांना आणि इतर संशोधन-केंद्रांना अमेरिकन पुस्तकें, शास्त्रीय आणि अध्यापनाचीं उपकरणें, आणि अमेरिकन शैक्षणिक तज्ज्ञांची मदत मिळत आहे. या योजनेचें सध्या चौथें वर्ष चालूं आहे.

अमेरिकन कॉंग्रेसनें "पब्लिक लॉ ४८०" हा कायदा केला आहे, त्यान्वयें शिलकी शेतीमाल मित्र-राष्ट्रांना विकून त्याची किंमत त्यांच्याच चलनांत स्वीकारतां येते. या कायद्यान्वयें भारताला सतत अन्नधान्याची मदत मिळत आली आहे. आतांपर्यंत या कायद्याखालीं भारत आणि अमेरिका यांच्यामध्यें चार करार झाले असून त्यांत भारताला ४२५ कोटी रु. किंमतीचा १,१५,००,००० टन अमेरिकन गहूं, तांदूळ व इतर शेतीमाल पुरविण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

"पब्लिक लॉ ४८०" खालील करारांचें एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे त्यामुळें भारताला आपल्या मर्यादित परकीय चलनावर ताण न देतां अन्नधान्य आणि इतर शेती माल खरेदी करतां येतो. दुसरें महत्त्वाचें वैशिष्ट्य म्हणजे या मालाची भारतांत विक्री करून जी किंमत येते, तिचा मोठा भाग फेर-कर्जें म्हणून किंवा भारताच्या विकास योजनांना देणग्या म्हणून दिल्या जातात. अशा रीतीनें आतांपर्यंत एकंदर १५४ कोटी रुपये फेर-कर्जें म्हणून देण्यांत आलें आहे.

"पब्लिक लॉ ४८०" खालीं पुढील चौदा धरण योजनांना कर्जें मिळालीं आहेत:—

| | |
|---|---|
| कोयना वीज योजना (मुंबई राज्य) | रु. १,१४९ लाख |
| रिहांद (उत्तर प्रदेश) | रु. १,५८३ लाख |
| हिराकूड (ओरिसा) | रु. ४६४ लाख |
| चंबळ (मध्यप्रदेश–राजस्थान) | रु. १,३०४ लाख |
| माही (मुंबई) | रु. २०४ लाख |
| काकापारा (मुंबई) | रु. ३०२ लाख |
| दामोदर (बिहार) | रु. १,१३९ लाख |
| नागार्जुनसागर (आंध्र) | रु. ८९९ लाख |
| कोशी (बिहार) | रु. ७८८ लाख |
| भद्र रिझरवॉयर (म्हैसूर) | रु. ६३७ लाख |
| तुंगभद्रा (आंध्र) | रु. ३५१ लाख |
| महानदी पाटबंधारे योजना (ओरिसा) | रु. ५२० लाख |
| कुंदा वीज योजना (मद्रास) | रु. ७६३ लाख |
| शरावती वीज योजना (म्हैसूर) | रु. ६९७ लाख |

### तांत्रिक सहकार्य कार्यक्रम

अमेरिकन मदतीचा सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे अमेरिकेचा तांत्रिक सहकार्य मंडळाच्यामार्फत मिळणारी तांत्रिक व विकास कार्य याकरितां मदत. या योजनेसाठी अमेरिकेनें पहिल्या आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनांच्या पुरस्कारार्थ १९६ भारत-अमेरिकेच्या संयुक्त योजनांत भाग घेतला आहे. भारताच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाकरितां आवश्यक ती माहिती, तंत्र, माणसें आणि साहित्य उपलब्ध करणें हा या कार्यक्रमाचा हेतु आहे.

भारतानें जेव्हां पहिल्या पंचवार्षिक योजनेस सुरुवात केली, तेव्हांच तांत्रिक सहकार्य मंडळाच्या कामास प्रारंभ झाला. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत शेतीला प्राधान्य होतें. साहजिकच या कार्यक्रमाचा भर शेती आणि तत्सम योजनांवर होता. अशा रीतीनें शेती आणि नैसर्गिक साधनसामुग्री या क्षेत्रांत भारत व अमेरिका यांच्या २७ संयुक्त योजना चालू असून त्याकरितां आतांपर्यंत ७९ कोटी ३० लक्ष रु. मूल्य होईल, इतकी तांत्रिक मदत आणि पुरवठा केला आहे.

याशिवाय मच्छीमारी, दूध-योजना, कोंबड्यांचा व्यवसाय, यांकरितांहि तांत्रिक सहकार्य मंडळाकडून बरीच मदत झाली आहे.

गेल्या आठ वर्षांत तांत्रिक सहकार्य मंडळानें भारतांत निरनिराळ्या क्षेत्रांत काम करण्याकरितां सुमारें १,००० अमेरिकन तंत्रज्ञ दिले आहेत, आणि सुमारें ९५० भारतीय तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ यांना याच योजनेखालीं अमेरिकेंत आणि इतर राष्ट्रांत खास शिक्षण मिळालें आहे.

"तांत्रिक सहकार्य मंडळ" भारताला शिक्षणाची पुनर्रचना आणि वाढ, तसेंच वाढत्या सोयी उपलब्ध करणें आणि संशोधन कार्यक्रम या बाबतींतहि सक्रिय मदत करीत आहे. त्याचप्रमाणें फोर्ड आणि रॉकफेलर विश्वस्त निधि यांचीहि या कामीं मदत होत आहे. फोर्ड विश्वस्तनिधीची एक वैशिष्ट्यपूर्ण योजना म्हणजे, सात प्रमुख अमेरिकन पोलाद उत्पादक आणि अनेक अमेरिकन विद्यापीठें यांच्या सक्रिय सहकार्यानें भारताच्या वाढत्या पोलाद धंद्याकरितां सुमारें तीनशें इंजिनियरांना शिक्षण देणें हीं होय.

याशिवाय फुलब्राइट आणि स्मिथ-मुंट शिष्यवृत्ति योजनेखालीं सुमारें ९०० भारतीय विद्यार्थी, शिक्षक, आणि संशोधक यांना अमेरिकेंत उच्च शिक्षणाकरितां प्रवास खर्च आणि पाठ्यवेतनें देण्यांत आलीं आहेत. त्याचप्रमाणें या शिष्यवृत्ती कार्यक्रमान्वयें २५० हून अधिक अमेरिकन अभ्यासू भारतांत अभ्यास आणि संशोधन याकरितां आले आहेत.

### उद्योगधंद्यांना मदत

उद्योगधंदे आणि खाणी या क्षेत्रांत ४० भारत-अमेरिकन संयुक्त योजना चालू असून त्याकरितां अमेरिकेनें एकंदर ५२ कोटि ६५ लक्ष रुपये दिले आहेत. या क्षेत्रांतील सर्वांत मोठी योजना म्हणजे औद्योगिक कारणांकरितां पोलादाची आयात.

भारताच्या विस्तृत रेल्वे वाहतुकीचा विस्तार वाढविण्याकरितां तांत्रिक सहकार्य मंडळानें १०० रेल्वे इंजिनें, ८,७३० वाघिणी, २,५५,००० टन पोलाद आणि ४,००० टन रूळ पुरविले आहेत. याशिवाय दळणवळणाच्या क्षेत्रांतहि या मंडळानें एकंदर ३७ कोटि रुपयांची मदत केली आहे.

आरोग्य आणि स्वच्छता या क्षेत्रांतील चौदा योजनांकरितां या मंडळानें एकंदर ४० कोटी रुपयांची मदत दिली आहे.

### खाजगी मदत

अनेक अमेरिकन शैक्षणिक, दानशूर आणि धार्मिक संघटना आणि विश्वस्तनिधी आणि स्वेच्छेनें मदत देणाऱ्या संस्था याहि गेलीं दहा वर्षे विविध स्वरूपाची मदत देत आहेत.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : १४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २. ता. ३१-७-५७ — वा. ग. आळतेकर, कार्यकारी संचालक

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:-भोर, जि. पुणें.

शाखा:-पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ९१,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:-बुधवार प. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

एस्. ए. कुलकर्णी, मॅनेजर.

### लडाख भागावर निसर्गाची अवकृपा

चिनी लष्करानें लडाखच्या कांहीं सरहद्दीवरील भागावर आक्रमण केल्यापासून ह्या भागाकडे हिंदी जनतेचें लक्ष वेधलें गेलें आहे. लडाखचा प्रदेश आहे तरी कसा? लडाख प्रदेश कांहीं काश्मीरसारखा हिरवागार नाहीं. उलट, निसर्गानें फारच थोड्या देणग्या त्याच्या पदरांत टाकल्या आहेत. ह्या प्रदेशांतील बहुतेक भाग उघड्याबोडक्या खडकांनीं व वाळूच्या पठारांनीं व्यापलेला आहे. कडक उष्णता व थंडी ह्यांच्या दरम्यान हवा हेलकावे खात असते. हवेंत आर्द्रता जवळ जवळ नसतेच. पावसाचें मानहि अत्यल्प म्हणजे बरसाल अवघें ३ इंच आहे. डोंगराचे माथे आणि खिंडी सोडल्या तर बर्फाहि बेताचेंच पडतें. दिवस-रात्र ह्यांच्या दरम्यान तपमानाचा फरक बराच असतो. कांहीं ठिकाणीं उन्हाळयांत संध्याकाळीं ठेवलेलें उकळतें पाणी सकाळीं बर्फाच्या रूपांत आढळून येतें. जीवनाचीं साधनें अतिशय तुटपुंजीं आहेत. त्यामुळें लडाखमधील लोकवस्तीचें दर चौरस मैलांतील प्रमाण अवघें १·२५ इतकें कमी आहे. जास्तींत जास्त लोकवस्ती दर चौरस मैलांत ६·६ इतकीच सांपडते. बहुतेक लोक शेतीच्या साह्यानें आपला गुजारा कसाबसा करीत असतात. पण जमीन वालुकामय व उत्पादनास प्रतिकूल असल्यामुळें पेरलेल्याच्या तिप्पट किंवा चौपट इतकेंच उत्पादन होऊं शकतें. पिकाचें जास्तींत जास्त प्रमाण १० पट असतें. शेतीची पद्धतहि अतिशय ओबडधोबड व जुनाट आहे. प्रत्येक कुटुंबाला कसता येण्यासारख्या जमिनीवर मर्यादा आपोआपच पडलेली आहे. ज्या कुटुंबांत माणसें कमी असतील त्या कुटुंबाला अर्थातच मोठी जमीन कसता येत नाहीं. नाहीं म्हणावयास लडाखच्या उंचीवर असलेल्या भागांत गुरांचे व मेंढ्यांचे कळप मात्र बरेच जगूं शकतात.

---

**पत्रकारांची धांवपळ**—अध्यक्ष आयसेनहोअर १९ दिवसांत ११ देशांचा दौरा करणार आहेत. त्यांच्या दौऱ्याची वार्ता आपआपल्या देशांतील लोकांना देण्यासाठी ब्रिटन, अमेरिका व फ्रान्स इत्यादि देशांतून ८२ पत्रकार आले होते. प्रत्येक पत्रकाराला अध्यक्षांबरोबर फिरण्यासाठी ४,००० डॉलर्स खर्च करावे लागतील व २२,००० मैल भ्रमंती करावी लागेल.

**वन्य जमातींबद्दल संशोधन**—आंध्र राज्यांतील विशाखापट्टम् व श्रीकाकलम् जिल्ह्यांतील वन्य जमातींच्या जीवनाविषयीं व संस्कृतिविषयीं संशोधन करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. ह्या कामासाठीं राज्य सरकारनें ५०,००० रुपये मंजूर केले आहेत. संशोधनाचें काम आंध्र विद्यापीठातर्फे करण्यांत येणार आहे.

**मंगळाचे फोटो घेणार?**—रशिअन शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ ह्यांनीं चंद्राभोंवतीं प्रदक्षिणा घालणारा उपग्रह सोडून त्याच्या अदृश्य बाजूचीं छायाचित्रें घेतलीं. असाच आणखी एक उपग्रह सोडून मंगळाचीं छायाचित्रें अंतराळांतून घेण्याचा प्रयत्न लवकरच करण्यांत येणार आहे. मंगळावर जीवसृष्टि असली तर ह्या प्रयत्नानें ती सिद्ध होण्याची शक्यता आहे.

**जुना मनोरा पाडणार**—वाराणसी येथील पंचगंगा घाटानजीक इतिहासप्रसिद्ध औरंगजेब मशीद आहे. ह्या मशिदीचा एकच मनोरा सध्यां उभा आहे. मनोरा ३०० फूट उंच असून आतां तो जीर्ण झाल्यामुळें पडण्याचा धोका आहे. आसपासच्या घरांना त्यामुळें धोका उत्पन्न झाला आहे. पुराणवस्तुसंशोधन खात्यानें मनोरा उतरण्याचें ठरविलें आहे.

**पुरापासून संरक्षणाची योजना**—ओरिसा सरकारनें राज्यांतील नद्यांना येणाऱ्या पुरापासून संरक्षण करण्याची एक योजना आंखली आहे. योजनेसाठी २३ कोटी रुपये खर्च येईल. योजना अंमलांत आणण्यासाठी राज्यसरकार मध्यवर्ती सरकारकडे मदत मागणार आहे. ओरिसांत आलेल्या गेल्या पुरांत ५ लाख एकर जमिनींतील पिकांची नासाडी झालेली होती व ३,००० गुरें वाहून गेलीं होतीं.

**कातड्याच्या कलमाची शस्त्रक्रिया**—कातड्याच्या कलमाच्या शस्त्रक्रियेचे जनक म्हणून ओळखले जाणारे डॉ. हॅरोल्ड गिलीज सध्यां भारताच्या दौऱ्यावर आहेत. हिंदी शस्त्रवैद्यांना ही शस्त्रक्रिया शिकण्यासाठी मदत देतां यावी म्हणून एक निधि उभारण्यांत येणार असल्याचें त्यांनीं मुंबई येथें सांगितलें. त्यांच्या मतानें बरे झालेले महारोगी व भाजल्यामुळें विद्रूप झालेलीं मुलें ह्यांना अशा शस्त्रक्रियेचा फार उपयोग होईल.

**तांदूळ सडण्याची सहकारी गिरणी**—ठाणें जिल्ह्यांत वाशिंद ह्या ठिकाणीं सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारी तांदूळ सडण्याची एक गिरणी स्थापन करण्यांत आली आहे. ठाणे जिल्ह्यांतील ह्या प्रकारची ही पहिलीच गिरणी आहे. अशाच नमुन्याच्या आणखी तीन गिरण्या काढण्यांत येण्याचा संभव आहे.

**नाट्यकलेला उत्तेजन**—१९५९-६० सालीं मुंबई सरकारनें नाट्यकलेच्या उत्कर्षासाठी ८४,००० रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. उत्तम ठरलेल्या मराठी व गुजराती नाटकाच्या लेखकांना बक्षिसें, प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना नाट्याचें शिक्षण, संस्कृत नाट्यमहोत्सव इत्यादींच्या द्वारां हें उत्तेजन देण्यांत येईल.

**आयसेनहोअर ह्यांच्या आगमनाचा चित्रपट**—अमेरिकेचे अध्यक्ष आयसेनहोअर हे दिल्ली येथील पालम विमानतळावर उतरले त्यावेळीं दोन परदेशी ध्वनिक्षेपक कंपन्यांनीं त्या प्रसंगाचे टेलिव्हिजनसाठी चित्रण केलें. हा चित्रपट ताबडतोब इंग्लंड व अमेरिकेला पाठविण्यांत आला. चित्रपट दिल्लीहून मुंबईला पाठविण्यासाठी वरील कंपन्यांनीं १२,००० रुपये देऊन एक खास विमान भाड्यानें घेतलें होतें.

---


**पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि., पुणें शहर**

## जाहीर सूचना

बँकेची वार्षिक साधारण सभा व संचालकांच्या निवडणुका रविवार, दि. २७-१२-५९ रोजीं व्हावयाच्या असल्यानें शॉप ॲक्टमधील तरतुदीप्रमाणें मा. बोर्डानें सोमवार, दि. २८।१२।५९ रोजीं बँकेस बदली साप्ताहिक सुट्टी देण्याचें ठरविलें आहे.

सबब बँकेच्या सर्व कचेऱ्या दि. २८ डिसेंबर १९५९ रोजीं बंद राहतील.

पुणें २.
दि. १४-१२-५९.

वा. ग. अळतेकर,
कार्यकारी संचालक.

---

## कण आणि क्षण

**( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )**

लेखक:–श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

### धान्योत्पादनाच्या वाढीसाठी रबी मोहीम ७·५४ कोटी रुपयांची तरतूद

गेल्या वर्षीच्या रबी मोहिमेची प्रगति लक्षांत घेतां, मुंबई सरकारनें सदर मोहीम याहि वर्षी चालू ठेवण्याचें ठरविलें आहे. भारत सरकारनें, धान्योत्पादनाच्या वाढीसाठी सुरू केलेल्या राष्ट्रव्यापी मोहिमेचाच हा एक भाग आहे. या सालीं मुंबई राज्यांत ३·५३ लक्ष एकर क्षेत्र जोमदार लागवडीखाली तर १४·५५ लक्ष एकर क्षेत्र विस्तृत प्रमाणावरच्या लागवडीखाली आणण्याचें ठरविण्यांत आलें आहे. पैकी २५·७४ लक्ष एकर क्षेत्र ( १·७४ लक्ष एकर क्षेत्र जोमदार लागवडीखालील व २४ लक्ष एकर क्षेत्र विस्तृत प्रमाणावरच्या लागवडीखालील) ज्वारीच्या पिकाखाली आणि उरलेली १२·३४ लक्ष एकर जमीन ( म्हणजे १·७९ लक्ष एकर क्षेत्र जोमदार लागवडीखालील व १·५५ लक्ष एकर क्षेत्र विस्तृत प्रमाणावरच्या लागवडीखालील ) गव्हाच्या पिकाखाली असेल.

धान्योत्पादन वाढविण्यासाठी सुधारलेल्या शेतीचा अवलंब करण्यांत येईल. धान्योत्पादनांत १,८०,६६० टन इतकें म्हणजे ज्वारीचें उत्पादन १,१३,४०० टनांनीं तर गव्हाचें उत्पादन हें ६७,२६० टनांनीं वाढेल अशी अपेक्षा आहे. या योजनेनुसार सरकारनें शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी आणि अशाच प्रकारच्या अन्य कामांसाठी ७·५४ कोटी रुपयांची खास तरतूद केली आहे. सहकारी संस्थांतर्फे देण्यांत येणाऱ्या सर्वसाधारण आर्थिक साहाय्यातिरिक्त वरील प्रकारची तरतूद करण्यांत आली आहे.

---

### कामगारांच्या सहकारी संस्थांना सवलती

कामगारांच्या सहकारी संस्थांना अंदाजित दरानें कामें देतेवेळीं, जुने अंदाज दुरुस्त करण्यांत यावेत आणि हे दुरुस्त अंदाज, त्या वेळीं अस्तित्वांत असलेल्या वर्गीकृत दरांशीं यासंबंधीच्या खर्चाचा मेळ बसावा म्हणून, एखाद्या योग्य अशा अधिकाऱ्यांकडून मंजूर करून घेण्यांत यावेत असें मुंबई सरकारच्या बांधकाम खात्यानें आपल्या सर्व अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत.

तसेंच कामगारांच्या सहकारी संस्थांना कामासंबंधींचीं टेंडरें देण्यासंबंधीच्या सवलतींच्या बाबतींतहि, अशाप्रकारच्या संस्थांनीं सादर केलेलें टेंडर हें स्वीकृत करण्याजोग्या किमान टेंडरापेक्षा पांच टक्क्यांच्या आंत असेल तर त्यांना पसंती देण्याबाबतची सवलत १ लाख रुपये खर्चाच्या मर्यादेपर्यंतच्या कामांच्या बाबतींत लागू करावी असाहि आदेश देण्यांत आला आहे. एक लाख रुपयांहून अधिक खर्चाच्या बाबतींत मात्र उपर्युक्त संस्थांना वरील सवलत मिळणार नाहीं.

त्याचप्रमाणें ६ टक्क्यांसंबंधींची सवलत, २०,००० रुपयांहून कमी खर्चाच्या बाबतींतहि वरील संस्थांना, मग सुरुवातीस अंदाजित खर्चानें काम करण्यास नकार दिला तरी देण्यांत यावी असा सरकारनें आदेश दिला आहे.

---

**सहारा वाळवंटाखालील तेल**—सहारा वाळवंटाखाली असलेल्या तेलाचा शोध लावून फ्रेंच शास्त्रज्ञांनी व तंत्रज्ञांनीं आतां हें तेल जगाच्या बाजारपेठेंत आणण्यास प्रारंभ केला आहे. तेलाच्या विहिरीपासून भूमध्य समुद्रावरील बंदरापर्यंत तेल वाहून नेण्यासाठी ३७५ मैल लांबीचे नळ घालण्यांत आले आहेत.

नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

## दि बेळगांव बँक लिमिटेड

**बेळगांव**

( शेड्यूल्ड बँक )

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्यें, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंग्जचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी

जनरल मॅनेजर

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.

( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

**भरपाई झालेलें भाग भांडवल :**

भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष

मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष

रु. १ कोटी, २५ लक्ष

**गंगाजळी व इतर फंड :** रु. ५३ लक्ष

**एकूण ठेवी :** रु. १२ कोटी

**खेळतें भांडवल :** रु. २४ कोटींचे वर

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड

मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.